International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.4 Mar – Apr 2023

# सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील रोपवाटिकांचा तुलनात्मक अभ्यास

**प्राजक्ता पतंगराव लाड**
संशोधक विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
***Corresponding Author*** - **प्राजक्ता पतंगराव लाड**
Email- prajaktapawar1307@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7919385

## प्रस्तावना

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो या कृषीप्रधान देशातील लोकांच्या वाढत्या अन्नधान्याच्या गरजा शेती व्यवसायातून होते म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेचा कृषी हा कणा म्हणूनही ओळखला जातो या कृषी व्यवसायात अलीकडे आधुनिकता वाढत चाललेली आहे त्यातीलच एक महत्त्वाचा भाग म्हणजे नर्सरी किंवा रोपवाटिका व्यवसाय होय नर्सरी म्हणजे काय किंवा हा व्यवसाय करण्यासाठी प्रामुख्याने कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता असते याचा प्रामुख्याने विचार या शोधनिबंधात आपण करू नर्सरी किंवा रोपवाटिका म्हणजे काय? रोपवाटिकेतून जातिवंत रोपांची कलमांची आणि बियाणांची उत्पत्ती रोपांचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन संवर्धन निरनिराळ्या अभिवृत्तीतून एकत्रित समूहाने केलेले असते तिला रोपवाटिका असे म्हणतात. आपण या शोधनिबंधात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील रोपवाटिकांचा तुलनात्मक अभ्यास पाहणार आहोत

### अभ्यास पद्धती :

सदर अभ्यासासाठी विविध संदर्भ ग्रंथ तसेच संकेतस्थळावरून मिळालेली माहिती अशी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे

### अभ्यासाची गृहिते :

1) रोपवाटिकांच्या विविध प्रकारांचा अभ्यास करणे.

2) रोपवाटिका आधुनिकीकरणाच्या विविध पद्धती अभ्यासणे.

3) रोपवाटिकेचे महत्त्व व फायदे जाणून घेणे

सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील रोपवाटिकांचा आराखडा पुढील प्रमाणे,

तक्ता क्रमांक 1

| सांगली जिल्हा( रोपांचा प्रकार ) | नमुना संख्या | कोल्हापूर जिल्हा | नमुना संख्या |
|---|---|---|---|
| ऊस रोपवाटिका | 50 | ऊस रोपवाटिका | 50 |
| भाजीपाला( वांगी रोपे ) | 50 | भाजीपाला ( वांगी रोपे ) | 50 |
| फुल रोपे ( गुलाब) | 50 | फुल रोपे ( गुलाब) | 50 |
| फळ रोपे ( आंबा ) | 50 | फळ रोपे ( आंबा ) | 50 |

संदर्भ: ( रोपवाटिका प्रत्यक्ष मुलाखत 2021-22)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, रोपवाटिकांचा अभ्यास करीत असताना सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येकी ऊस रोपांची 50 भाजीपाला वांगे रोपे 50 फळ रूपामध्ये आंबा रोपाची 50 व फुलरोपांमध्ये गुलाब रोपाची 50 अशी एकूण सांगली जिल्ह्याची 200 नमुना रोपे निवड केली त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्याची ऊस रोपे 50 भाजीपाला वांगी रोपे 50 गुलाब रोपे 50 व फळ रोपे आंबा 50 प्रमाणे 200 नमुना सॅम्पल ची निवड केली अशी एकूण सांगली व कोल्हापूर जिल्ह्याची 400 नमुना निवड केली हे वरील तक्त्यावरून दिसून आले

त्याचप्रमाणे आपण प्रत्येकी एका रोपाला बाजारपेठेमध्ये किती किंमत मिळते याचाही अभ्यास करणार आहोत ची माहिती पुढील तक्त्यावरून दिसून येईल

सांगली जिल्ह्याचा तक्ता क्रमांक 2

| सांगली जिल्ह्यातील रोपे | एका रोपाला मिळणारी किंमत |
|---|---|
| ऊस | 1 रु 80 पैसे ते 2 रु 40 पैशापर्यंत |
| वांगे | 1रु ते 1:30 पैशापर्यंत |
| गुलाब | 30 रु ते 60 रु पर्यंत |
| आंबा | 80 रु ते 250 रुपया पर्यंत |

संदर्भ:( प्रत्यक्ष रोपवाटिका मुलाखत 2022-23)

वरील तक्त्यामध्ये असे दिसून येते की, सांगली जिल्ह्यात ऊस रूपाला 1रु 80 पैसे ते 2 रु 40 पैशापर्यंत विक्री केली जाते तसेच मांगीर रूपाला 1रु ते 1:30 पैशापर्यंत विक्री केली जाते. तसेच गुलाब रूपाला 30 ते 60रु पर्यंत विक्री केली जाते त्याचप्रमाणे अंबा रोपेही 80 रु पासून 250 कृपया पर्यंत विक्री केली जाते हे वरील तक्त्यावरून नमूद होते

कोल्हापूर जिल्हा तक्ता क्रमांक 3

| कोल्हापूर जिल्ह्यातील रोपे | एका रोपाला मिळणारी किंमत |
|---|---|
| ऊस | 2 रु ते 2:30 पैसे पर्यंत |
| वांगे | 1 रु ते 1:20 पैसे पर्यंत |
| गुलाब | 30रु ते 60 रुपया पर्यंत |
| आंबा | 80रु ते 250 रुपया पर्यंत |

संदर्भ:( प्रत्यक्ष मुलाखत 2021-22)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की कोल्हापूर जिल्ह्यात रोपांची विक्री ही अनुक्रमे पुढील प्रमाणे ऊस रुपाला 2रु ते 2:30 अशा पर्यंत विक्री केली जाते त्याचप्रमाणे वांगी रोपाची 1रु ते 1:20 पैशापर्यंत विक्री केली जाते तसेच गुलाब रोपाची 30 ते 60 पर्यंत विक्री केली जाते व आंबा रोपाची 80 रु ते 250 रुपयांपर्यंत विक्री केली जाते हे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते. ज्याप्रमाणे आपण विक्रीचा अभ्यास केला त्याप्रमाणे आपण एका रूपामध्ये किती नफा मिळतो याचाही अभ्यास करणार आहोत तर पुढील तक्त्यामध्ये आपण एका रूपा मागे किती नफा मिळतो हे पाहणार आहोत प्रथम आपण सांगली जिल्ह्याचा अभ्यास करू

सांगली जिल्हा तक्ता क्रमांक 4

| सांगली जिल्हा | 1 रोपा मागे मिळणारा नफा |
|---|---|
| ऊस | 40 ते 50 पैसे |
| वांगे | 30 ते 40 पैसे |
| गुलाब | 15 ते 20 रुपये |
| आंबा | 50 ते 60 रुपये |

संदर्भ:( प्रत्यक्ष मुलाखत 2021-22)

वरील तक्त्यामध्ये असे दिसून येते की, ऊस रोपाला 1 रोपा मागे 40 ते 50 पैसे नफा मिळतो तसेच वांगे रोपाला 30 ते 0 पैशापर्यंत नफा मिळतो तसेच गुलाब रोपाला 15 ते 20 रुपयांपर्यंत नफा मिळतो व आंबा रोपाला 50 ते 60 रुपये नफा मिळतो हे वरील तक्त्यावरून दिसून येते

कोल्हापूर जिल्हा तक्ता क्रमांक 5

| रोपांचा प्रकार | एका रोपा मागे मिळणारा नफा |
|---|---|
| ऊस | 30 ते 40 पैसे पर्यंत |
| वांगे | 40 ते 50 पैसे |
| गुलाब | 15ते 20 रुपये |
| आंबा | 50 ते 60 रुपये |

संदर्भ: ( प्रत्यक्ष मुलाखत 2021-22)

वरील तक्त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येकी एका रोपामागे मिळणारा नफा नमूद केलेला आहे त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे ऊस रोपामध्ये एका रोपाला 30 ते 40 पैशापर्यंत नफा मिळतो त्याचप्रमाणे वांगी रोपा मागे 40 ते 50 पैशापर्यंत नफा मिळतो तसेच एका गुलाब रोपा मागे 15 ते 20 रुपयापर्यंत नफा मिळतो व एका आंबा रोपा मागे 50 ते 60 रुपयांपर्यंत नफा मिळतो हे वरील तक्त्यावरून दिसून येते

सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनात्मक अभ्यास करीत असताना असे दिसून आले दोन्ही जिल्ह्यातल्या रोपांमध्ये मिळणारा नफा हा जवळपास सारखाच आहे रोपवाटिका व्यवसाय हा फायदेशीर असून त्यामध्ये नावीन्यपूर्ण बदल करत गेल्यास येणाऱ्या काळामध्ये हा व्यवसाय अत्यंत चांगल्या पद्धतीने भरभराटीस येईल अशी आशा आहे

सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील रोपवाटिकांना भेडसावणाऱ्या समस्या पुढील प्रमाणे

1) शासनाच्या अनुदानाचा अभाव

2) नोंदणीकृत रोपवाटिकांचे अल्प प्रमाण

3) आधुनिकीकरणाचा अभाव

4) नैसर्गिक आपत्ती

5) मजुरांची टंचाई

6) वाढती महागाई

7) वाढत्या खतांच्या किमती

8) बाजारपेठेंचा अभाव

9) जिल्हा बाहेरील रोपांच्या मागणीचा अभाव

10) खात्रीशीर रोपांचे अपुरे प्रमाण

11) शासनाचे दुर्लक्ष

12) सबसिडीसाठी दिरंगाई

13) वाढता वाहतूक खर्च

रोपवाटिकेंचा सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचा अभ्यास करीत असताना वरील समस्या या आढळून आल्या.

**उपाययोजना :**

1) कामगारांना प्रशिक्षण देणे व आधुनिकीकरणाची जनजागृती करणे

2) खतांचा गरजेपुरताच व मर्यादित वापर करणे

3) जिल्ह्याबाहेर रोपांच्या विक्रीस चालना देणे

4) पाण्याची बचत करून पुरेसा वापर करणे

5) बाजारपेठांची माहिती घेऊन बाजारपेठ उपलब्ध च्या ठिकाणी रोपांची विक्री करणे

6) खात्रीशीर रोपांची उपलब्धता व विक्री करणे

7) रोपांची विक्री पश्चात निशुल्क माहिती देणे

8) बुकिंग सेवा निशुल्क करणे

9) निशुल्क किमतीत रोपांची पोहोच बांधावर करणे

अशाप्रकारे सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचा रोप वाटिकेचा अभ्यास करीत असताना संशोधकाच्या ज्या बाबी लक्षात आल्या त्या थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न वरील लेखात केलेला आहे

**संदर्भ:**

1)https//mr.m.wikipedia.org

2) प्रत्यक्ष मुलाखत संबंधित शेतकरी यांच्या भेटीतून निष्कर्ष 2021-22)